# पेठचे शंकर खंडू पाटील

चंद्रकुमार नलगे

आज राज्यरस्त्यावरील गाव म्हणून पेठचा उल्लेख होतो. पूर्वी एक लहान खेडे होते. पण तिठ्याला जवळ असलेलं म्हणून लोकांना त्याची ओळख होती. आपलं खेडेपण जपत, कृषी संस्कृतीचं नातं, जोडत आपल्याच तंद्रीत जगणारं खेडं. परंपरागत आचार विचारांची नाळ असली तरी १९४२ स्वातंत्र्य चळवळीतील देश काळजात धगधगती आग ठेवत वाळवा तालुक्यातील मातीत पाय रोवून उभं होतं. पेठेतील या जोडीतलं ठळक नाव सर्वदूर नसलं तरी त्या परिसराला माहित होतं. माझ्या बालपणात माझ्यापर्यंत पोचलेलं नाव मला प्रेरणा देतं झालं होते. मी सातवीला माझ्या भेडसगावच्या शाळेत असताना एक बातमी माझ्या कानावर पडली. त्यावेळेचे प्रसिद्ध लेखक वि. स. खांडेकर उर्फ भाऊसाहेब हे एका कार्यक्रमा साठी पेठला येणार होते. शिक्षकांचे संमेलन होतं. मी त्या वयात खूप वाचन करीत होतो. भाऊसाहेबांची पुस्तकं मला फार आवडत. त्यांना प्रत्यक्ष पहाता येईल म्हणून मी पेठला जायला अधीर झालो. तीस पस्तीस मैल चालत गेलो. भाऊसाहेबांना पाहिलं प्रत्यक्ष लेखक, पहाताना होणारा आनंद माझ्या बाळ काळजात भावत नव्हता. त्यांचं भाषण ऐकलं – किती छान बोलले. त्या तंद्रीतच माझी बाळपावलं प्रभावित होऊन गावाकडे जाऊन राहिली. नंतर त्याच वेळेचे शंकर खंडू पाटील हे लेखक म्हणून भेटण्याचा योग आला.

कोल्हापुरात चंद्रकांत शेट्ये यांनी चंद्रकांत शेट्ये प्रकाशनमंदिर या नावाने स्वतःच  प्रकाशन संस्था सुरु केली होती. पुणे, मुंबई नंतर अनेक चांगल्या लेखकांची पुस्तके श्री शेट्ये यांनी प्रकाशित केली होती. त्यांच्या प्रकाशन संस्थेच्या माडीवर अत्रे सभासगृहात अनेक साहित्यिक, नाट्य व चित्रपट क्षेत्रातील कलावंत येत. या ठिकाणीच शंकर खंडू पाटील यांची भेट झाली. ते मूळचेच शिक्षक होते. मध्यम शरीरपट्टीचे, गोल चेहऱ्याचे, काळसर वर्णाचे बोलणं मिठ्ठास स्वभाव विनोदी. हसतमुख समाजाचे उत्तम निरीक्षण शंकर खंडू पाटील हे उत्तम शिक्षक होते. ग्रामीण परिसराची जीवन प्रणाली हा त्यांचा अंगभूत भाग होता. कृषी संस्कृतीचे सखोल चिंतन त्यांच्या शब्दाशब्दातून व्यक्त होई. खेड्यापाड्यातील चालीरिती रीतिरिवाज, बदलत जाणारी जीवन रहाटी यांचा त्यांचा अभ्यास होता. राजकीय क्षेत्राशी त्यांचा जवळून सबंध होता. राजकारणातील मतलबीपणा, भोंदुगिरी, स्वार्थी वृत्ती, राजकीय व्यक्तीचा नाटकीपणा, समाजाची होणारी गळचेपी, बोकाळलेला भ्रष्टाचार, यांचे सूक्ष्मतर बारकावे त्यांना माहित होते. ते हाडाचेच शिक्षक असल्याने समाजातील विकृती, अनन्य अनाचार पाहून ते अस्वस्थ होत. या अशा अस्वस्थतेतूनच त्यांनी शिक्षकांची नोकरी सोडली. राजकीय क्षेत्रापासून दूर झाले. आपल्या जन्म आणि कर्मभूमीपासून अलग झाले.

कोल्हापूरला रहायला आले केवळ लेखनावर संस्कार भागविण्याचा जगावेगळा इरादा बाळगला. अनुभवसंपन्न, बहुश्रुत अशा व्यक्तिमत्वातून लेखनाचा आविष्कार धडत राहिला. खेड्यापाड्यातील कोरडे होत जाणारे लोकजीवन त्यांनी अवस्था साहित्यातून चित्रित केले. नव्या विज्ञानाने, राजकारणाने उध्वस्त होणारी जीवने रेखाटली. नव्या युगाच्या नव्या वाऱ्याने वादळात सापडलेली कुटुंबव्यवस्था हा त्यांच्या लेखणीचा विषय झाला. समाजातील दांभिकपणावर त्यांनी प्रकाश टाकला. भ्रष्टाचाराने समाजाची होणारी घालमेल ही त्यांच्या कथा, कादंबरीच्या विषय बनली. समाजाचा श्वास दाबून टाकू पहाणाऱ्या अनेक रंगेल, गुंडपुंड अशा व्यक्तिरेखा त्या मांडल्या. सामाजिक व्यंगावर त्यांनी पोटतिडिकीने लिहिले.

अनेक अस्सल, आणि इरसाल व्यक्तिरेखा उभ्या केल्या. सामूहिक जीवनास उदात्तता असावी, परस्पर जीवनभाव असावा, राजकारण लोककल्याणकारी असावे, सर्वसामान्य जीवनाविषयी आस्था असावी अशी त्यांची मनोधारणा व्यक्त  होताना दिसते. उपेक्षितांस उन्नतीचा मार्ग शोधण्यातच समाजाचे हित आहे असे त्यांचे मत होते. स्त्रियांकडे

भोगवस्तू म्हणून न पहाता त्यांच्या कर्तृत्त्वाचा, शालिनतेचा, ममत्वाचा गौरव करावा असे त्यांनी अनेक कथा–कादंबऱ्यांतून मांडलेले आहे. ग्रामीण वाङ्मयात आपल्या कथा. कादंबऱ्याच्या वास्तवदर्शी चित्रणाने भर टाकली आहे. ग्रामीण वास्तवाचे यथार्थ चित्रण त्यांच्या साहित्यातून झाले आहे. ग्रामीण वातावरण, ग्रामीण स्वभाव वैशिष्ट्ये, ग्रामीण बोलीभाषा यामुळे त्यांचे साहित्य वेगळे वाटते. एक ढंगबाज रसरशीतपणा हा त्यांच्या साहित्याचा विशेष आहे. ग्रामीण बाज असलेली त्यांची ठसठशीत चित्रणे जीवंत वाटतात. ग्रामीण अस्सलपणा त्यांच्या निवेदन शैलीलालाही लाभलेला आहे. मराठी साहित्याला अस्पर्शित असलेले अनेक शब्दप्रयोग त्यांच्या लेखनात आहेत. व्यक्तिरेखामधील उचललेली कथात्मता यामुळे शंकर खंडू पाटील यांचे साहित्य मनाला भिडते. त्यांचे 'सागर', 'चोरा मी वंदिले', चिमणचारा' इ. कथासंग्रह त्यादृष्टीने महत्वाचे आहेत. त्यांनी अनेक कथातून रंगविलेली विषयाची विविधता पहाण्यासारखी आहे.

शंकर खंडू पाटील यांनी ग्रामीण राजकारणावर आधारित 'सरपंच' ही कादंबरी लिहिली आहे. विकृत राजकारणाचे चित्रण या कादंबरीत केले आहे. 'घुंगरु' ही त्यांची कादंबरी अशीच वेगळ्या विषयावरील आहे. वेश्या जीवनावरील ही कादंबरी मानवी जीवनातील विसंगती, कुरुपता चित्रित करणारी आहे. शंकर खंडू पाटील यांच्या कथांवर 'खंडोबाची आण' सारखे मराठी चित्रपट निघाले आहेत. त्यांनी काही चित्रपटांच्या कथा, पटकथा, संवाद लिहिले आहेत. या चित्रपट लेखनातूनही त्यांनी सामाजिक, राजकीय व्यंगावर प्रकाश टाकलेला आहे. अन्याय, भ्रष्टाचार, दुराचार यांविषयी ते पोटतिडिकीने लिहिले होते. असल्याबद्दल एक प्रकारची चीड, संताप व्यक्त होताना दिसतो.
जीवनाच्या उत्थापनाची आच त्यांच्या लेखनाला आहे.

शंकर खंडू पाटील यांनी उर्वरित काळात वृत्तपत्रीय लेखनही केले आहे. त्यांचे अग्रलेख सामाजिक समस्यांसंबंधी परखडपणे मत व्यक्त करणारे आहे. हार आणि प्रहार हा त्यांच्या वृत्तपत्रीय लेखनाचा विशेष गुण आहे. समाजातील सत्यवृत्ती जीवनासाठी ते सकारात्मक लेखन करीत. उपेक्षितांबद्दल कळकळ व्यक्त होताना दिसे. समाज निर्वेद व निकोप रहावा, त्याची उन्नतीकडे वाटचाल हे रहावी यासाठी ते लिहीत. पण जे समाजाच्या प्रवृत्तीला धक्के देणारे ढोंगी, आत्मकेंद्रित असलेल्या व्यक्ती, घटना, कंपू यावर प्रहार करीत. त्यांच्या लेखणीचे विविधांगी दर्शन आपल्याला घडते. त्याच्या लेखणीचे तेज आणि ओज हे दोन्ही गुणही प्रसंगपरत्वे व्यक्त होताना दिसतात. ते उत्तम कथा कथनकार होते. विनोदी ढंगांच्या कथा ते सहजपणे कथन करीत कथा कथनातून त्यांनी समाजाचे रंजन तर केले शिवाय लोकशिक्षणही साधले. दीड तप त्यांनी कथाकथन करुन ग. दि. माडगूळकर, व्यंकटेश माडगूळकर, शंकर पाटील, द. मा. मिरासदार यांची कथा कथन परंपरा समृध्द केली आहे. सांगली जिल्ह्याची थोर अशी साहित्य परंपरा आहे. नागर, ग्रामीण असे मराठी साहित्याचे विविध प्रवाह समृध्द करणाऱ्या लेखकांची मांदियाळी या सांगली जिल्ह्याचे अनुभवली आहे. त्यातीलच एक गाव नाव म्हणजे शंकर खंडू पाटील म्हणजेच 'शंकर खंडू' होय.